जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०६/२०२३
## दि.१४/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १८०/२०२३,भादविक ३०२,२०१ |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर गायकवाड, पोलीस अंमलदार, बंडगार्डन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०२०३ रोजी सकाळी ०९/३० वा. अगर त्यापुर्वी मालधक्का चौकाचे पुर्वेस स्टेशन रोडचे उत्तरेस असणारे मारुती मंदिराचे मागे रेल्वे वसाहतीलगत |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,कुठल्यातरी अज्ञात कारणावरून, एक अनोळखी इसम,वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे याचे डोक्यात दगड घालुन,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारुन,मृतदेहाची ओळख पटु नये म्हणुन,त्याचा चेहरा विद्रुप करुन,पुरावा नष्ट केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मधाळे ९४२२४२७८४७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३७३/२०२३,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०३(२),आर्म ॲक्ट ४(२५),महा.पोलीस अधि.कलम ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | आदित्य बर्डे,वय-२२ वर्षे,रा.संतोषनगर,कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | १.एक विधीसंषर्घग्रस्त बालक,वय-१७ वर्षे,रा.आंबेगाव-पठार,पुणे (ताब्यात आहे) २.आदित्य विशाल गोसावी, वय-२० वर्षे,रा.गोसावी अपार्टमेंट,श्रीनगर सोसायटी,धनकवडी,पुणे ३.राज राकेश परदेशी,वय-२३ वर्षे,रा. त्रिमुर्ती चौक,धनकवडी,पुणे ४.ओमकार चंद्रकांत सावंत,वय-१८ वर्षे,रा.म्हसोबा चौक,मोहननगर धनकवडी पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०६/२०२३ रोजी रात्रौ ०९/३० वा.वेलनेस मेडीकलचे समोर,भारती विद्यापीठ बँक मार्केट जवळ,चहा हाईट,धनकवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ ऋषी बर्डे,त्यांचे मित्र केतन कोंढरे व हर्षल खिलारे यांचेसोबत चहा पित असताना,फिर्यादी यांची यातील अ.क्र.१ याचेसोबत झालेल्या मस्करीचा वादाचा राग मनात धरुन,त्याने त्याचे इतर साथीदारांसह येवुन,गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी व भाऊ ऋषी बर्डे यास शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,ऋषी बर्डे यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर,हाता-पायावर धारधार हत्याराने वार करुन,त्यास गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जी.डी.घावटे ९५९४६१५५३३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७६/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | दिपक हरपळे,वय-३९ वर्षे,रा.चंदवाडी,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०६/२०२३ रोजी १४/३० वा.पुणे-सोलापुर रोडवर फुरसुंगी फाटयावरील सिग्नल जवळ,हडपसर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे चुलते काशीनाथ गुलाब हरपळे,वय-६७ वर्षे,रा.जुने कॅनोल जवळ,चंदवाडी, फुरसुंगी, पुणे हे सोलापुर रोडवरील फुरसुंगी फाटयावरवरील सिग्नलवर थांबले असताना,त्यांचे पाठीमागुन हडपसर दिशेकडे जाणारे ट्रकवरील चालकाने,त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी काशीनाथ हरपळे यांना पाठीमागुन जबर धडक देवुन,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भापकर ९९२१०५०३५९ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १५९/२०२३,भादविक ३७९,४२७ |
| **फिर्यादी** | सुरेश सोनवणे,वय-५७ वर्षे,रा.२७९,गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०६/२०२३ रोजी चे रात्रौ ११/०० वा ते दि १४/०६/२०२३ रोजी चे सकाळी ०७/०० वा चे दरम्यान सणस ग्राऊंड येथील फुटपाथ ते मार्केटयार्ड बस डेपो जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल,स्वारगेट,पुणे येथे सुरक्षा अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. पीएमपीएमएल स्वारगेट डेपोच्या बसेसच्या फेरी संपल्यावर रात्रीचे वेळी त्या पुलगेट,पुणे येथील महात्मा गांधी बस स्थानकावर पार्किंग करत असतात. परंतु पुलगेट येथील महात्मा गांधी बस स्थानकावर सध्या पालखी असल्याने तेथे बसेस पार्किंग करता येणे शक्य नसल्याने,काही बसेस या सणस ग्राऊंडचे बाहेर रस्त्यावर फुटपाथवर पार्क करून,बसची चावी ही बसलाच लावलेली असताना,बस क्रं.एमएच/१२/क्युजी/१६८५ (खाते क्र.६७७) ही बस चावीसह मार्केटयार्ड बस डेपो जवळ कोणीतरी चोरी करून घेवुन जाऊन,सदर ठिकाणी बस सोडुन,बस मधील ५,०००/- रु किची एक्साइड कंपनीची बॅटरी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करून नेली. तसेच इतर पीएमपीएमएल दोन्ही बसच्या काचा फोडुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पालीस अंमलदार, सिताप ०२०/२४४५२७६९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २७६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३८ वर्ष,रा.मु.पा.निमणी,ता.तासगाव,जि.सांगली |
| **आरोपीत** | एक महिला,वय-१९,रा.चिखली,बुलढाणा (अटक) २.एक विधीसंषर्घग्रस्त मुलगी (ताब्यात आहे) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा ते ०७/४० वा चे सुमा. क्रोमा चौक, बी.टी.कवडे रोड, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे कुटंबासह पालखीचे दर्शन घेण्यासाठी थांबले असताना,यातील नमुद महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ७५,०००/- रुपये किंमतीचे चोरी केल्याबाबत फिर्यादी यांना त्यांचेवर संशय असल्याने त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अजय शितोळे ९८५०६१३३८९ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३८४/२०२३,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | राहुल उभे,वय ३५ वर्षे,रा.समता नगर,पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०६/२०२३ रोजी रात्री १०/३० वा.११/०० वा.चे दरम्यान समतानगर,सागर शिंदे यांची चाळ,लोंढे वस्ती,पाषाण,पुणे येथील मोकळया जागेत |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी रिक्षा नं.एमएच/१२/जेएस/८१२२ ही भाडेतत्त्वावर चालवण्यास घेतली असुन,ते रिक्षाचा वापर प्रवाशी वाहतुकीसाठी करत असतात. फिर्यादी यांनी त्यांचेकडील रिक्षा ही नमुद ठिकाणी मोकळया जागेत पार्क केली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,जाणीवपुर्वक आगळीक करुन,सदरची रिक्षा पेटवुन,सदर रिक्षाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कपील भालेराव ८७९३१०३१४४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**